## हळद

**जमीन** : उत्तम निचऱ्याची मध्यम काळी, नदी काठची- पोयटा माती अती उत्तम, चुनखडीयुक्त व चोपण जमीन टाळावी.

**पूर्व मशागत** : उभ्या आडव्या २ नांगरटी, कुळवणी करणे, जमीन भुसभुशीत करणे.

**सुधारित वाण** : फुले स्वरूपा, सेलम, कृष्णा, आयआयएसआर केदारम, आयआयएसआर अल्लेपी सुप्रीम

**पेरणी व लागवडीचे अंतर** : १५ मे ते जून चा पहिला आठवडा. ७५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून सरीच्या दोन्ही बाजूस ३७.५ x ३० सें.मी. अंतरावर वरंब्यामध्ये लागण करावी. ठिबक सिंचनासाठी २० ते २५ सें.मी. उंचीचे १२० सें.मी. रुंदीचे गादी वाफे तयार करून ३० x ३० सें.मी.वर लागवड करावी.

**बियाणे** : गड्डे बियाणे २५ ते ३० क्विंटल प्रति हेक्टरी

**बीज प्रक्रिया** : क्विनॉल फॉस २५ ई.सी. (२० मि.ली.) + १० लि. पाणी किंवा डायमेथोएट ३० ई.सी. (१० मि.ली.) + १० लिटर पाण्याचे द्रावण १०० ते १२० किलो बियाण्यास वापरावे. बियाणे द्रावणात किमान १५-२० मिनिटे बुडवून ठेवावे.

**आंतरपिके** : हळद + घेवडा, हळद + मुळा, हळद + पालेभाज्या, हळद + मेथी, हळद + मिरची.

**खते** : लागवडीपूर्वी प्रति हेक्टरी ५० ते ८० बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत मिसळून टाकावे. रासायनिक खतांची मात्रा प्रति हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व १०० किलो पालाश द्यावी. लागवडीपूर्वी १०० किलो स्फुरद व १०० किलो पालाश द्यावे. नत्राची मात्र दोन समान हफ्त्यामध्ये लागवडीनंतर ६ व १० ते १२ आठवड्याने भरणी करतेवेळी द्यावी.

**भरखते** : हेक्टरी २ टन निंबोळी किंवा करंजी पेंडीचा वापर भरणीच्या वेळी करावा.

**सेंद्रीय हळद**

**१) जैविक बीज प्रक्रिया :** हेक्टरी ५०० लिटर पाण्यात व्हॅम (VAM) १२.५ किलो + पी.एस.बी. ५ किलो + ॲझोस्पायरिलियम ५ किलो मिसळून द्रावणात १५ मिनिटे कंद बुडवावेत.

**२) खतांची मात्रा :** शेणखत २२ टन/हे. + लिंबोळी पेंड ४ टन/हे. + गांडुळ खत २ टन/हे.

**भरणी करणे :** हळदीचे कंद उघडे राहू नयेत यासाठी लागवडीनंतर १० ते १२ आठवड्यांनी मातीने भरणी करावी. भरणी करताना शिफारस केलेल्या खतांच्या मात्रा द्याव्यात.

**आंतरमशागत :** दोन ते तीन वेळा खुरपणी करावी.

**पाणी व्यवस्थापन :** लागवडीनंतर ५ ते ७ दिवसाच्या अंतराने, पावसाळ्यात पाऊस नसल्यास १० ते १२ दिवसाच्या अंतराने तर हिवाळ्यात १२ ते १५ दिवसाच्या अंतराने जमिनीच्या प्रतिनुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

### पीक संरक्षण

**काढणी :** पिकाची काढणी पीक नऊ महिन्याचे झाल्यावर करावी. काढणीपूर्वी जमिनीच्या प्रतिनुसार १५ ते २० दिवस पाणी तोडावे. कुदळीने खोदून काढणी करावी.

**उत्पादन :** सुधारित तंत्रानुसार लागवड केल्यास ओल्या हळदीचे हेक्टरी २५० ते ३५० क्विंटल तर वाळलेल्या हळदीचे ६० ते ७५ क्विंटल उत्पादन मिळते. गादी वाफ्यावर लागवड केल्यास हळद काढणी यंत्राव्दारे काढणी करता येते त्यामुळे मजुरीत बचत होते.

**प्रक्रिया :** हळदीच्या जास्त उताऱ्यासाठी आणि कुरकुमीन टिकविण्याकरीता २०० किलो क्षमतेच्या कुकर यंत्रामध्ये १५ मिनीटात हळद वाफेवर ( १.२ कि/सें.मी$^{२}$) शिजवावी.